MHAU070026852023

**नियमित दिवाणी दावा क्र.४२३/२०२३**
वसिम सय्यद वि. रईसा व इतर

## नि.क्र.१३ खाली आदेश

प्रस्तुत अर्ज व त्यावरील म्हणणे यांचे सुक्ष्मपणे अवलोकन केले. दोनही पक्षांना विस्तृतपणे ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले.

२. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत दावा गुणअवगुणावर निर्णीत करण्याकरीता, अनेक दावे व अर्जाची उत्पत्ती टाळण्याकरीता, प्रस्तुत दाव्याची परिणामकारक शीघ्र गतीने निर्गतीकरीता आणि नैसर्गिक न्याय तत्व प्रणाली विचारात घेता प्रतिवादींना त्यांची कैफियत व म्हणणे सादर करण्याकरीता संधी देणे आवश्यक असल्याचे दिसुन येते. प्रस्तुत अर्जदार यांचे विरुद्ध पारित झालेला विना कैफियत व म्हणणेचा आदेश रद्द केल्यास कोणाचेही नुकसान होणार नसुन उलटपक्षी प्रस्तुत दावा गुण अवगुणावर चालविण्यास मदतच होणार आहे. प्रस्तुत अर्जदार यांनी विना कैफियत व म्हणणेचा पारित झालेला आदेश रद्द करण्याकरीता दिलेले कारण विचारात घेता. सदरचा आदेश रद्द करुन नैसर्गिक न्याय तत्वानुसार अर्जदार यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे योग्य व उचित होईल. तथापि प्रस्तुत दाव्यात विना कैफियत व म्हणणेचा आदेश पारित झाल्याची दिनांक आणि प्रस्तुत अर्ज दाखल केल्याची दिनांक विचारात घेता प्रस्तुत अर्जदारांवर उचित कॉस्ट आकारणे योग्य होईल. जेणे करुन दोनही पक्षांना समतोल न्याय दिल्यासारखे होईल. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :-

## आदेश

प्रस्तुतचा अर्ज खालील प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे :-

१. प्रतिवादी यांच्याविरुद्ध पारित करण्यात आलेला विना कैफियत व म्हणणेचा आदेश प्रतिवादी यांनी वादी यांना कॉस्ट रु. १०००/- देण्याच्या अटींवर रद्द करण्यात येत आहे.

२. दोनही पक्षांनी नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत/-**

दि.२१/०३/२०२५

श्रीमती.पी.बी.पाटील
सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर,
गंगापूर